दैनिक ललकार 

# देशाची अर्थव्यवस्था सुरळीत चालावयाची असेल तर कृषीप्रधान देशातील शेती व्यवस्था टिकली पाहिजे

## बबनराव शिंदे



कुंडल येथे पार पडलेल्या सुयेक च्या अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभात मार्गदर्शन करताना आमदार बबनदादा शिंदे व उपस्थित क्रांतीचे चेअरमन अरुण अण्णा लाड, सचिव शहाजी लाड, प्रा. सुभाष दगडे, प्राचार्य डा. के.एम.नलावडे आदी.

कुंडल दि. १५ (वार्ताहर)- देशाची अर्थव्यवस्था सुरळीत चालावयाची असेल तर कृषीप्रधान देशातील शेती व्यवस्था टिकली पाहिजे असे प्रतिपादन माढ्याचे आमदार बबनदादा शिंदे यांनी केले, ते कुंडल येथे क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात आयोजित शिवाजी युनिव्हार्सिटी इकानामिक्स असोशिएशन च्या २८ व्या वार्षिक अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभात बोलत होते यावेळी क्रांती उद्योगसमुहाचे प्रमुख अरुण अण्णा लाड, जेष्ठ अर्थतज्ञ प्रा. डा. जे. एफ. पाटील, अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. सुभाष दगडे, सस्थेचे सचिव शहाजी लाड, प्राचार्य डा. के एम नलावडे आदि मान्यवर उपस्थित होते .

बबनदादा पुढे म्हणाले की शासनाकडून देशाच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य स्रोत असलेली शेती व शेतीपुरक व्यवसायाकडे दुर्लक्ष होत असल्यानेच शेती व शेतकरी आर्थिक दृष्टया अडचणीत येत असल्यानेच देशाची अर्थव्यवस्था डळमळीत होत आहे असे सांगुन ते म्हणाले की या करीता शासनाने कर्जमाफी पेक्षा सर्वच शेतीमालाला हमीभाव देणे आवश्यक आहे शेतीमालाचे दर सतत कमी जास्त होत असल्याने शेतकर्यांचे आर्थिक बजेट कोलमडून तो कर्जबाजारी होत आहे. ज्याप्रमाणे ऊसाला एफ.आर.पी.प्रमाणे दराची शाश्वती असल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्याची अवस्था जरा बरी आहे .

तरीही अधिक उत्पन्ना करीता क्षेत्र वाढत नसल्याने उत्पन्न वाढीकडे लक्षदेणे गरजेचे आहे असे ते शेवटी म्हणाले .

प्रा. डा. सुभाष दगडे म्हणाले की या सुयेक च्या अधिवेशनाला २८ वर्षे पुर्ण होत आहेत याच्या यशस्वितेमध्ये आदरनिया धनंजय गाडगिळ व त्यांच्यासारख्या तज्ञाचे मार्गदर्शन लाभले आहे.यावेळी त्यांनी अर्थशास्त्राच्या परिषदेचे महत्व अधोरेखीत करुन क्रांती कारखाना सहकारातील एक आदर्श उदाहरण असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्षअरुण लाड म्हणाले की १९५५ साली कौटूंबिक स्वरुपात सुरु झालेला सहकार हळूहळू, शेती, भिशी, बँक व सहकारी उद्योग इथपर्यंत वाढला आणी ह्याच सहकाराने समाजकारणाला दिशा मिळाली असून काही सहकारी क्षेत्रातील उद्योग अयशस्वी झाले असले तरीही बहुतांश सहकारी उद्योग अत्यंत चांगले चालले आहेत , आजकाल ची राजकीय मंडळी हाच चांगले चाललेले सहकारी क्षेत्र राजकीय स्वार्थापोटी उद्धवस्त करण्याचा प्रयत्न करत आहेत मात्र त्या सहकारी संस्थेच्या सभासदांनी वेळीच लक्ष देऊन सर्वांच्या प्रगतीचा मार्ग असणार्या सहकाराची जपणूक करणे गरजेचे आहेत . सर्वांत महत्वाचे सहकार टिकविण्यासाठी शेती टीकली पाहिजे या करीता आपण व शासनाने एकत्रीत पणे प्रयत्न करणे गरजेचे आहे .

यावेळी प्राचार्य डा. के. एम. नलावडे यांनी प्रास्ताविक केले तर परीचय प्रा. डा. पी.बी. लाड यांनी तर सुयेक चे अहवाल वाचन प्रा. संजय ठीगळे यांनी केले .तरअधिवेशनाची सांगता क्रांती दुध संघाचे अध्यक्ष किरण तात्या लाड, जि. प. सदस्य शरद लाड , प्रा. डा. के. एम नलावडे , व्ही. वाय पाटील, व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत झाली. या दोन दिवसीय अधिवेशनाचे सुत्रसंचलन प्रा. नवनाथ गुंड, जे. ए. पाटील यांनी केले तर आभार प्रा. मोहनराव सदामते यांनी मानले . या अधिवेशना करीता महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले .

दै ललकार ता 16/01/2018

पुढारी

बुधवार
१७ जानेवारी २०१८

# शेती व्यवस्था टिकली पाहिजे


## आमदार शिंदे : कुंडल येथे लाड महाविद्यालयात अर्थशास्त्र अधिवेशन

**कुंडल : वार्ताहर**

अर्थव्यवस्था सुरळीत चालण्यासाठी कृषीप्रधान देशातील शेती व्यवस्था टिकली पाहिजे, असे प्रतिपादन माढ्याचे आमदार बबनदादा शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र असोशिएशनच्यावतीने कुंडल येथे क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात २८ वे वार्षिक अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. याच्या उद्‌घाटनप्रसंगी आमदार शिंदे बोलत होते. क्रांती उद्योग समूहाचे प्रमुख अरुणअण्णा लाड, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. सुभाष दगडे प्रमुख उपस्थित होते.

आ. शिंदे म्हणाले, शासनाकडून अर्थव्यवस्थेचा मुख्य स्त्रोत असलेली शेती व शेतीपूरक व्यवसायांकडे



**कुंडल (ता. पलूस) : येथे 'सुयेक'च्या अधिवेशनच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना आमदार बबनदादा शिंदे. यावेळी (व्यासपीठावर) अरुणअण्णा लाड, शहाजी लाड, प्रा. डॉ. सुभाष दगडे आदी.**

शेतकरी आर्थिक अडचणीत येत आहे. अर्थव्यवस्था कोलमडत आहे. शासनाने कर्जमाफीपेक्षा शेतीमालाला हमीभाव देणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी देखील अधिक उत्पन्नासाठी पीक उत्पादनवाढीसाठी लक्ष देण्याची गरज आहे.

अर्थशास्त्राच्या परिषदेचे महत्व वाढत आहे. सहकारात क्रांती कारखाना आदर्शवत असल्याचे ते म्हणाले.

अरुणअण्णा लाड म्हणाले, सहकाराने समाजकारणाला दिशा मिळाली आहे. काही सहकारी उद्योग अयशस्वी झाले असले तरीही बहुतांश

आहेत. मात्र आता राजकीय मंडळी सहकारी क्षेत्र राजकीय स्वार्थापोटी उद्‌ध्वस्त करण्याचा प्रयत्न करत आहेत. सहकार टिकविण्यासाठी शेती टिकली पाहिजे. याचे भान राखून शेतकरी, पदाधिकारी आणि शासनाने एकत्रित प्रयत्न करण्याची गरज आहे. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. के. एम. नलवडे यांनी केले. प्रा. डॉ. पी. बी. लाड यांनी परिचय करुन दिला. परिषदेचे अहवालवाचन प्रा. संजय ठिगळे यांनी केले.

दरम्यान, अधिवेशनाचा समारोप क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड, जि. प. सदस्य शरद लाड, व्ही. वाय पाटील यांच्या उपस्थितीत झाला. प्रा. नवनाथ गुंड, जे. ए. पाटील यांनी सूत्रसंचलन केले. प्रा. मोहनराव सदामते यांनी आभार मानले. संयोजन सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी

# तरुण भारत

ता- १७/०१/२०१८

# शेतीव्यवस्था टिकली पाहिजे : आ. शिंदे

## आ. बबनदादा शिंदे : कुंडल येथे सुयेकच्या वतीने २८ वे वार्षिक अधिवेशनाचे आयोजन

वार्ताहर
कुंडल

देशाची अर्थव्यवस्था सुरळीत चालायची असेल तर कृषीप्रधान देशातील शेती व्यवस्था टिकली पाहिजे, असे प्रतिपादन माढ्याचे आमदार बबन शिंदे यांनी केले. ते कुंडल येथे क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात आयोजित शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन च्या २८ व्या वार्षिक अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभात बोलत होते.

यावेळी क्रांती उद्योगसमुहाचे प्रमुख अरुण लाड, ज्येष्ठ अर्थतज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. सुभाष दगडे, संस्थेचे सचिव शहाजी लाड, प्राचार्य डॉ. के एम नलावडे उपस्थित होते.

आ. शिंदे पुढे म्हणाले शासनाकडून देशाच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य स्त्रोत असलेली शेती व शेतीपुरक व्यवसायांकडे दुर्लक्ष होत असल्यानेच शेती व शेतकरी आर्थिकदृष्ट्या अडचणीत येत असल्यानेच देशाची अर्थव्यवस्था डळमळीत होत आहे असे सांगुन ते म्हणाले की या करीता शासनाने कर्जमाफीपेक्षा सर्वच शेतीमालाला हमीभाव देणे आवश्यक आहे. शेतीमालाचे



कुंडल : कुंडल येथे सुयेकच्या अधिवेशन उद्घाटन समारंभात मार्गदर्शन करताना आमदार बबन शिंदे व बाजूस अरुण लाड, शहाजी लाड, प्रा. सुभाष दगडे, प्राचार्य नलावडे आदी.

दर सतत कमी जास्त होत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक बजेट कोलमडून तो कर्जबाजारी होत आहे. ज्याप्रमाणे ऊसाला एफ. आर. पी. प्रमाणे दराची शाश्वती असल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांची अवस्था जरा बरी आहे. तरीही अधिक उत्पन्नां करीता क्षेत्र वाढत नसल्याने उत्पन्न वाढीकडे लक्षदेणे गरजेचे आहे, असे ते शेवटी म्हणाले.

प्रा. डॉ. सुभाष दगडे म्हणाले, या सुयेकच्या अधिवेशनाला २८ वर्षे पुर्ण होत आहेत याच्या यशस्वितेमध्ये आदरणीय धनंजय गाडगीळ व त्यांच्यासारख्या तज्ञाचे मार्गदर्शन लाभले आहे.

यावेळी त्यांनी अर्थशास्त्राच्या परिषदेचे महत्व अधोरेखीत करुन क्रांती कारखाना सहकारातील एक आदर्श उदाहरण असल्याचे सांगितले.

अरूण लाड म्हणाले की १९५५ साली कौटूंबिक स्वरुपात सुरु झालेला सहकार हळूहळू शेती, भिशी, बँक व सहकारी उद्योग इथपर्यंत वाढला आणि ह्याच सहकाराने समाजकारणाला दिशा मिळाली असून काही सहकारी क्षेत्रातील उद्योग अयशस्वी झाले असले तरीही बहुतांश सहकारी उद्योग अत्यंत चांगले चालले आहेत.

आजकालची राजकीय मंडळी हाच चांगले चाललेले सहकारी क्षेत्र राजकीय स्वार्थापोटी उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न करत आहेत मात्र त्या सहकारी संस्थेच्या सभासदांनी वेळीच लक्ष देऊन सर्वांच्या प्रगतीचा मार्ग असणाऱ्या सहकाराची जपणूक करणे गरजेचे आहेत. सर्वात महत्वाचे सहकार टिकविण्यासाठी शेती टिकली पाहिजे या करीता आपण व शासनाने एकत्रीतपणे प्रयत्न करावेत.

यावेळी प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे यांनी प्रास्ताविक केले तर परिचय प्रा. डॉ. पी.बी. लाड यांनी तर सुयेकचे अहवाल वाचन प्रा. संजय ठिगळे यांनी केले. अधिवेशनाची सांगता क्रांती दुध संघाचे अध्यक्ष किरण लाड, जि. प. सदस्य शरद लाड , प्रा. डॉ. के. एम नलावडे, व्ही. वाय पाटील, व इतरांच्या उपस्थितीत झाली.

या दोन दिवसीय अधिवेशनाचे सुत्रसंचलन प्रा. नवनाथ गुंड, जे. ए. पाटील यांनी केले तर आभार प्रा. मोहनराव सदामते यांनी मानले.

अधिवेशना करीता महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने यांनी केले.



# श्रमसंस्कार शिबिरातून संस्कार प्राप्त करून जीवन कसे आहे याचा अनुभव घ्यावा

## अरूण लाड

कुंडल दि. १७ (वार्ताहर) - श्रमसंस्कार शिबिरातून संस्कार प्राप्त करून जीवन कसे आहे याचा अनुभव घ्यावा व प्रत्येक क्षेत्रात नवीन पद्धतीच्यासाठी प्रयत्न करावेत यासाठी मोठे योगदान दिल्याशिवाय संधी मिळणार नाही असे मत क्रांती उद्योग व शिक्षण समूहाचे प्रमुख अरुण अण्णा लाड यांनी व्यक्त केले, ते क्रांतिअग्रणी जी डी बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. हे शिबीर मोहित्येवडगाव (ता कडेगाव) येथे आयोजित केले आहे .

अरुण लाड पुढे म्हणाले विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनात चांगला अनुभव घ्यावा, खेड्यातील जीवन काय आहे याची माहिती घ्यावी , कॉलेज जीवनात चांगले अनुभव घेऊन जीवन चांगल्या पद्धतीने जगावे संशोधक म्हणून विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा. इंग्रजांनी कारकून बनविण्याचे शिक्षण दिले आहे . त्या ऐवजी नविन तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावे आपल्या जीवनासाठी व समाजाला आवश्यक असणारा अभ्यास करावा. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या माजी जिल्हा परिषद अध्यक्षा मालनताई मोहिते म्हणाल्या महिलांनी आज सर्व क्षेत्रात आघाडी घेतली आहे स्त्रीयांनी स्वसंरक्षणासाठी ज्युदो कराटे शिकले पाहिजे, सर्व मुला मुलींनी एकत्र येवून कामे केली पाहिजेत श्रमसंस्कार शिबीरातून चांगले काम करून समाजाला दिशा द्यावी विद्यार्थी उत्तम शिक्षण घेऊन अनेक मोठ्या पदावर विराजमान होतील अशी आशा आहे. प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक सरपंच विजय मोहिते यांनी केले. कार्यक्रमास उपसरपंच सुनिल मोहिते प्राचार्य डॉ के एस [illegible], माधवराव मोहिते भिमराव मोहिते ,डॉ प्रताप लाड, कार्यक्रम अधिकारी एन के गुंड, भगवानराव मोहिते दत्तात्रय मोहिते, हणमंतराव मोहिते, सुभाष मोहिते, वसंतराव मोहिते, भिमराव मोहिते, सुधीर मोहिते ,विश्वास मोहिते, सुधाकर मोहिते, वसंतराव मोरे, वैशाली मोहिते, संतोष कुंभार, यास्मीन शिकलगार , तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य विविध संस्थांचे पदाधिकारी स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते शेवटी आभार जे ए पाटील यांनी मानले.

## ार्यस्थळावर ...यास पुष्पांजली

खराडे, आष्ट्याचे अर्जुन माने,अनिल पाटील,संग्राम जाधव,युवराज सुर्यवंशी,सर्जेराव देशमुख, एस.टी.पाटील, मोहनराव शिंदे, अविनाश खरात,संजय खबाळे

# ...स्था टिकली पाहिजे : बबनदादा शिंदे



...कुंडल येथे पार पडलेल्या 'सुयेक'च्या अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभात मार्गदर्शन करताना आमदार बबनदादा शिंदे. व्यासपीठावर ...ी'चे चेअरमन अरुण लाड, सचिव शहाजी लाड, प्रा. सुभाष दगडे, प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे आदी.

...िकदृष्ट्या अडचणीत येत ...्यानेच देशाची अर्थव्यवस्था ...ळीत होत आहे, असे सांगून ...णाले की, याकरिता शासनाने ...ाफीपेक्षा सर्वच शेतीमालाला ...ाव देणे आवश्यक आहे. ...ालाचे दर सतत कमी– ...न होत असल्याने शेतकऱ्यांचे ...क बजेट कोलमडून तो ...ाजारी होत आहे. ज्याप्रमाणे ...ला एफ.आर.पी.प्रमाणे दराची शाश्वती असल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्याची अवस्था जरा बरी आहे. तरीही अधिक उत्पन्नाकरिता क्षेत्र वाढत नसल्याने उत्पन्न वाढीकडे लक्षदेणे गरजेचे आहे, असे ते शेवटी म्हणाले .

प्रा. डॉ. सुभाष दगडे म्हणाले की, या 'सुयेक'च्या अधिवेशनाला २८ वर्षे पूर्ण होत आहेत. याच्या यशस्वितेमध्ये धनंजय गाडगीळ व त्यांच्यासारख्या तज्ज्ञाचे मार्गदर्शन लाभले आहे. यावेळी त्यांनी अर्थशास्त्राच्या परिषदेचे महत्त्व अधोरेखित करून क्रांती कारखाना सहकारातील एक आदर्श उदाहरण असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अरुण लाड म्हणाले की, १९५५ साली कौटुंबिक स्वरुपात सुरू झालेला सहकार हळूहळू, शेती, भिशी, बँक व सहकारी उद्योग इथपर्यंत वाढला आणि याच सहकाराने समाजकारणाला दिशा मिळाली असून काही सहकारी क्षेत्रातील उद्योग अयशस्वी झाले असले, तरीही बहुतांश सहकारी उद्योग अत्यंत चांगले चालले आहेत. आजकालची राजकीय मंडळी हीच चांगले चाललेले सहकारी क्षेत्र राजकीय स्वार्थापोटी उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र त्या सहकारी संस्थेच्या सभासदांनी वेळीच लक्ष देऊन सर्वांच्या प्रगतीचा मार्ग असणाऱ्या सहकाराची जपणूक करणे गरजेचे आहे. सर्वांत महत्त्वाचे सहकार टिकविण्यासाठी शेती टिकली पाहिजे, याकरिता आपण व शासनाने एकत्रितपणे प्रयात्न करणे गरजेचे आहे.

यावेळी प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे यांनी प्रास्ताविक केले. परिचय प्रा. डॉ. पी. बी. लाड यांनी करून दिला. 'सुयेक'चे अहवाल वाचन प्रा. संजय ठिगळे यांनी केले. अधिवेशनाची सांगता क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड, जिल्हा परिषद सदस्य शरद लाड, प्रा. डॉ. के. एम. नलावडे, व्ही. वाय. पाटील व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत झाली. या दोन दिवसीय अधिवेशनाचे सूत्रसंचलन प्रा. नवनाथ गुंड, जे. ए. पाटील यांनी केले, तर आभार प्रा. मोहनराव सदामते यांनी मानले. या अधिवेशना करिता महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले.

दै. केसरी , ता- १८/०१/२०१८




**मोहिते वडगाव (ता. कडेगाव) येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनांतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्‌घाटन समारंभात अरुण लाड यांनी मार्गदर्शन केले.**

# श्रमसंस्कार शिबिरातून जीवन जगण्याचा अनुभव : अरुण लाड

**कुंडल : वार्ताहर**

श्रमसंस्कार शिबिरातून संस्कार प्राप्त करून जीवन कसे आहे, याचा अनुभव घ्यावा. प्रत्येक क्षेत्रात नवीन घडविण्यासाठी प्रयत्न करावेत. मोठे योगदान दिल्याशिवाय संधी मिळणार नाही, असे मत क्रांती उद्योग व शिक्षण समूहाचे प्रमुख अरुण लाड यांनी व्यक्त केले.

क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनांतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबीर मोहिते-वडगाव (ता. कडेगाव) येथे आयोजित केले आहे. शिबिराच्या उद्‌घाटन समारंभप्रसंगी अध्यक्षस्थानावरून लाड बोलत होते.

लाड पुढे म्हणाले, नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावे. जीवनाला समाजाला आवश्यक असणारा अभ्यास करावा. माजी जिल्हा परिषद अध्यक्षा मालन मोहिते म्हणाल्या, श्रमसंस्कार शिबिरातून चांगले काम करून समाजाला दिशा द्यावी. स्वागत व प्रास्ताविक सरपंच विजय मोहिते यांनी केले. कार्यक्रमास सुनील मोहिते, प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे, माधवराव मोहिते, भीमराव मोहिते, डॉ. प्रताप लाड, एन. के. गुंड, भगवानराव मोहिते, दत्ताजीराव मोहिते, हणमंतराव मोहिते, सुभाष मोहिते, यशवंतराव मोहिते, भीमराव महिंद, सुधीर मोहिते, विकास मोहिते, सुदाम मोहिते उपस्थित होते.

दै. केसरी, ता- १५/०१/२०१८

तरुण भारत ता- १९/०१/२०१८

# रप्राप्तीसाठी श्रमसंस्कार शिबिरांची गरज

## ीन जीवनात चांगला अनुभव घ्यावा : खेड्यातील जीवनाची माहिती घ्यावी

र

स्कार प्राप्त करून
अनुभव घ्यावा व
विण्यासाठी प्रयत्न
मोठे योगदान
णार नाही, असे
ण समुहाचे प्रमुख
केले.
डी. बापू लाड
सेवा योजना
कार शिबीराच्या
लत होते. हे
आयोजित केले

ाले, विद्यार्थ्यांनी
चांगला अनुभव
काय आहे याची
जीवनात चांगले

अनुभव घेवून जीवन चांगल्या पद्धतीने जगावे संशोधक म्हणून, विद्यार्थांनी अभ्यास करावा. इंग्रजांनी कारकून बनविण्याचे शिक्षण दिले आहे. त्या ऐवजी नविन तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावे आपल्या जीवनासाठी व समाजाला आवश्यक असणारा अभ्यास करावा.

**संशोधक म्हणून विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा**

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या माजी जिल्हा परिषद अध्यक्षा मालनताई मोहिते म्हणाल्या, महिलांनी आज सर्व क्षेत्रात आघाडी घेतली आहे स्त्रियांनी स्वसरंक्षणासाठी ज्युदो कराटे शिकले पाहिजे, सर्व मुला मुलींनी एकत्र येवून कामे केली पाहिजेत.

श्रमसंस्कार शिबीरातून चांगले काम करून समाजाला दिशा द्यावी विद्यार्थी उत्तम शिक्षण घेवून अनेक मोठ्या पदावर विराजमान होतील अशी आशा आहे.

स्वागत व प्रास्ताविक सरपंच विजय मोहिते यांनी केले. कार्यक्रमास उपसरपंच सुनिल मोहिते प्राचार्य. डॉ. के. एम. नलावडे, माधवराव मोहिते, भिमराव मोहिते, डॉ. प्रताप लाड, कार्यक्रम अधिकारी एन. के. गुंड, भगवानराव मोहिते, दत्ताजीराव मोहिते, हणमंतराव मोहिते, सुभाष मोहिते, यशवंतराव मोहिते, भिमराव महिंद, सुधीर मोहिते, विकास मोहिते, सुधाकर मोहिते, वसंतराव मोरे, वैशाली मोहिते, ग्रा. पं. सदस्य विविध संस्थांचे पदाधिकारी आदी उपस्थित होते आभार जे. ए. पाटील यांनी मानले.



**कुंडल : मोहितेवडगाव येथे क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना क्रांतीचे अध्यक्ष अरुण लाड, उपस्थित मालनताई मोहिते व इतर मान्यवर.**

**लोकमत** ता- २४/०१/२०१८

## द्यापीठात गांधी अभ्यास केंद्रातर्फे व्याख्यानाचे आयोजन

# कडून हयातभर सामाजिक प्रबोधन



पीठात मंगळवारी डॉ. जी. डी. बापू लाड व्याख्यानमालेत डॉ. यांनी विचार मांडले. यावेळी डावीकडून अरुणआण्णा लाड, डी. ती पाटील उपस्थित होते.

### गावागावांत लढा

शेतकऱ्यांचे जीवन आनंदी करणे, सामान्य माणसाच्या जगण्याला सुरक्षितता देण्याकरिता ब्रिटिश सरकार हद्दपार करण्यासाठी जी. डी. बापूंनी आपल्या तुफान सेनेच्या मदतीने गावोगावी लढा उभा केला. त्यांनी उत्तरायुष्यात शोषणमुक्त समाजनिर्मितीचा ध्यास घेतला, असे डॉ. भोसले यांनी सांगितले.

त्व' असा होता. मानव्य विद्या या कार्यक्रमाच्या प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. ांती सहकारी साखर अध्यक्ष अरुणअण्णा लाड प्रमुख उपस्थित होते. डॉ. भोसले म्हणाले, भारतीय स्वातंत्र्यचळवळीचे सूत्र सुरुवातीला प्रामुख्याने उच्चविद्याविभूषित लोकांकडे होते. त्यात स्थित्यंतर आले ते महात्मा गांधी स्वातंत्र्यचळवळीत उतरल्यानंतर. सन १९४२चे 'भारत छोडो आंदोलन' मोठे होते. देशात चार ते पाच ठिकाणी प्रतिसरकारची स्थापना झाली. प्रामुख्याने उत्तर प्रदेश व महाराष्ट्रातील सातारा या ठिकाणी प्रतिसरकार जोरात होते. प्रतिसरकारच्या चळवळीत डॉ. लाड यांची मध्यवर्ती भूमिका होती. ते आपल्या बलाढ्य कर्तृत्वाने पुढे कष्टकरी, गरीब जनतेचे आधारवड बनले. प्र-कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, ब्रिटिश हस्तकांपासून मुक्ती मिळविण्यासाठी बापूंनी प्रखरतेने लढा दिला. कार्यक्रमास डॉ. डी. आर. मोरे, एस. एन. पवार, बी. एस. पवार, य. ना. कदम, प्रकाश कुंभार, आर. एच. पठाण, नंदा पारेकर, दशरथ पारेकर, व्ही. वाय. पाटील, सुरेश शिपूरकर, अवनिश पाटील उपस्थित होते. गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. शीतल भोसले यांनी सूत्रसंचालन केले. नेहा वाडेकर यांनी आभार मानले.

Hello Kolhapur
Page No. 3 Jan 24, 2018
Powered by: erelego.com

लोकमत ता-२४/०७/२०१८

# जी. डी. बापूंकडून सामाजिक कार्य

## अरुण भोसले; शिवाजी विद्यापीठातील व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : डॉ. जी. डी. बापू लाड यांनी समाजपरिवर्तन आणि सामाजिक प्रबोधनासाठी संपूर्ण हयात वेचली. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीत विविध स्तरांवर उभारलेल्या नेतृत्वात डॉ. लाड यांचे नेतृत्व वैशिष्ट्यपूर्ण होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ.अरुण भोसले यांनी मंगळवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रातर्फे आयोजित क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड व्याख्यानमालेअंतर्गत ते बोलत होते. त्यांच्या व्याख्यानाचा विषय 'जी. डी. बापू लाड : स्वातंत्र्यसंग्रामातील एक झुंजार नेतृत्व'असा होता. विद्यापीठाच्या मानव्य विद्या सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, तर क्रांती सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अरुणअण्णा लाड प्रमुख उपस्थित होते. डॉ. भोसले म्हणाले, भारतीय स्वातंत्र्यचळवळीचे सूत्र सुरुवातीला प्रामुख्याने उच्चविद्याविभूषित लोकांकडे होते. त्यात स्थित्यंतर आले ते महात्मा गांधी स्वातंत्र्यचळवळीत उतरल्यानंतर. त्यानंतर पुढे हळूहळू स्वातंत्र्यचळवळीच्या कक्षा विस्तारत गेल्या. सन १९४२चे 'भारत छोडो आंदोलन' मोठे होते. देशात चार ते पाच ठिकाणी प्रतिसरकारची स्थापना झाली. प्रामुख्याने उत्तर प्रदेश व महाराष्ट्रातील सातारा या ठिकाणी प्रतिसरकार जोरात होते. प्रतिसरकारच्या चळवळीत डॉ. लाड यांची मध्यवर्ती भूमिका होती. ते आपल्या बलाढ्य कर्तृत्वाने पुढे कष्टकरी, गरीब जनतेचे आधारवड बनले.

### गावा-गावांत लढा

शेतकऱ्यांचे जीवन आनंदी करणे, सामान्य माणसाच्या जगण्याला सुरक्षितता देण्याकरिता ब्रिटिश सरकार हद्दपार करण्यासाठी जी. डी. बापूंनी आपल्या तुफान सेनेच्या मदतीने गावोगावी लढा उभा केला. त्यांनी उत्तरायुष्यात शोषणमुक्त समाजनिर्मितीचा ध्यास घेतला, असे डॉ. भोसले यांनी सांगितले.

प्र-कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, ब्रिटिश हस्तकांपासून मुक्ती मिळविण्यासाठी बापूंनी प्रखरतेने लढा दिला. या कार्यक्रमास डॉ. डी. आर. मोरे, एस. एन. पवार, बी. एस. पवार, य. ना. कदम, प्रकाश कुंभार, आर. एच. पठाण, नंदा पारेकर, दशरथ पारेकर, व्ही. वाय. पाटील, सुरेश शिपूरकर, अवनिश पाटील उपस्थित होते. गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. शीतल भोसले यांनी सूत्रसंचालन केले. नेहा वाडेकर यांनी आभार मानले.

दै लोकमत, ता २४/०७/२०१८


# 'क्रांति' कार्यस्थळावर जी. डी. बापू लाड यांना अभिवादन

कुंडल : वार्ताहर

येथील क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या जनरल सेक्रेटरी पदी सोनाली शामराव शिंदे हिची बिनविरोध निवड झाली असून चौदा विद्यार्थी प्रतिनिधींची संख्या असलेली हि निवडणूक बिनविरोध झाली.

संपूर्ण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना उत्सुकता लागून राहिलेल्या जनरल सेक्रेटरी पदाच्या निवडणूकांचा कार्यक्रम विद्यापिठाने उशिरा जाहीर केल्याने विद्यार्थ्यांच्यात या निवडणूका बाबत प्रचंड उत्सुकता होती. या निवडणूकीत प्राचार्य नियुक्त निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रा. व्ही. आर. माने यांनी काम पाहीले तर प्रा. डा. बी. डी. वाघमारे, प्रा. विश्वास सावंत यांनी सहकार्य केले. सर्व निवडणूक प्रक्रीया प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.


जनरल सेक्रेटरी सोनाली शिंदे व पलूस महाविद्यालयाची जनयल सेक्रेटरी पुजा काशिद यांच्यासह समर्थक विद्यार्थ्यांनी



**सोनाली शिंदे व पुजा काशिद यांच्यासह समर्थक विद्यार्थ्यांनी क्रांति कारखाना कार्यस्थळावर जाऊन स्व. क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांच्या समाधीचे दर्शन घेतले.**

क्रांति कारखाना कार्यस्थळावर जाऊन स्व. क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांच्या समाधीचे दर्शन घेतले, यावेळी क्रांतिचे अध्यक्ष अरुण अण्णा लाड व जि. प. सदस्य शरद भाऊ लाड यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी युवा नेते रणजीत लाड, पलुस पंचायत समितीचे उपसभापती अरुण पवार, क्रांतीचे संचालक महाविर उर्फ गुंडाभाऊ चौगुले, विनायक महाडीक, विद्यार्थी राष्ट्रवादीचे अध्यक्ष ज्ञानेश पाटील, उपाध्यक्ष संदीप मुळीक, पवन नलवडे राहूल मोहिते यांनी तर आभार घोगांवचे युवक नेते अक्षय जाधव तसेच विविध विद्यार्थी उपस्थित होते.

दै. केसरी, ता २८/०९/२०१८



गांधी अभ्यास केंद्रातर्फे आयोजित डॉ. जी. डी. बापू लाड व्याख्यानमालेत डॉ. अरुण भोसले यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून अरुण लाड, डी. टी. शिर्के, भारती पाटील उपस्थित होत्या.

# स्वातंत्र्यलढ्यात जीडी बापूंचे मोठे योगदान : डॉ. अरुण भोसले

कुंडल : वार्ताहर

डॉ. जी. डी. बापू लाड यांनी समाजपरिवर्तन आणि सामाजिक प्रबोधनासाठी संपूर्ण हयात वेचली. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीत विविध स्तरांवर उभारलेल्या नेतृत्वात डॉ. लाड यांचे नेतृत्व वैशिष्ट्यपूर्ण होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अरुण भोसले यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रातर्फे आयोजित क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड व्याख्यानमालेअंतर्गत बोलत होते.

डी. टी. शिर्के होते. क्रांती उद्योग व शिक्षण समूहाचे प्रमुख अरुण लाड हे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. भोसले म्हणाले, प्रतिसरकारच्या चळवळीत डॉ. लाड यांची मध्यवर्ती भूमिका होती. शेतकऱ्यांचे जीवन आनंदी करण्यासाठी; तसेच सामान्य माणसाच्या जगण्याला सुरक्षितता देण्याकरिता ब्रिटीश सरकार हद्दपार करण्यासाठी जी. डी. बापूंनी तुफान सेनेच्या मदतीने गावोगावी लढा उभा केला. प्रभारी कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ब्रिटीश

उपस्थित होते. डॉ.भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले, शीतल भोसले यांनी सूत्रसंचालन केले.